

## ११ ऑगस्ट २०२३ मेरी माटी मेरा देश अंतर्गत वीर वंदन

प्रिन्सिपल अरुणराव कलोडे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जंगीतवार यांच्या अध्यक्षतेखाली मेरी माटी मेरा देश अभियान राबविण्यात आले तसेच पंचपण प्रतिज्ञाद्वारे वीर वंदन या कार्यक्रमात सुभेदार मेजर विजय मल्लेवार मराठा बटालियन यांचा सत्कार करण्यात आला मल्लेवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून देशप्रति असलेल्या कर्तव्याची जाणीव करून दिली आपले अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले कार्यक्रमाचे संचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. स्मिता जोशी यांनी केले तर प्राध्यापक काजल लंबाटे आणि आभार प्रदर्शन केले.





Scanned with OKEN Scanner

## वृक्षारोपण

राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे कलोडे महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम १५ ऑगस्ट ला घेण्यात आला यात विद्यार्थी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि परिसरातील नागरिकांच्या हस्ते विद्यालयीन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले यावेळी साईबाबा लोकसेवा संस्थेचे अध्यक्ष एडवोकेट ओमकार उमाटे,प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जंगीतवार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य क्रम अधिकारी डॉक्टर स्मिता जोशी प्राध्यापक वर्ग विद्यार्थी उपस्थित होते संचालन डॉक्टर स्मिता जोशी यांनी केले तर डॉ. सचिन भोगेकर यांनी आभार मानले.







Scanned with OKEN Scanner


## २ सप्टेंबर २०२३ मतदार नोंदणी

शासनाच्या आदेशानुसार ज्या विद्यार्थ्यांचे वय १८ वर्षे पूर्ण झाले किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा सर्व विद्यार्थ्यांचे मतदार होण्यासाठी नोंदणी करण्यात आली राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी यांनी ज्यांचे मतदार म्हणून नोंदणी झाली नव्हती अशांकडून फॉर्म भरून घेतले एकंदर विद्यार्थ्यांनी नोंदणी केली.

Scanned with OKEN Scanner

## २९ सप्टेंबर २०२३ श्रमदान

राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात श्रमदान हा कार्यक्रम घेण्यात आला यामध्ये प्लास्टिकचे निर्मूलन स्वच्छता अभियान अशा पद्धतीने श्रमदान घेण्यात आली यात सत्तावीस विद्यार्थी सहभाग दिला



## २६ जुलै २०२३ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण पोस्टर स्पर्धा

शासनाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविण्यातण्यात आले आहे त्याबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात असलेले संभ्रम कुतूहल यांनी पोस्टरद्वारे दाखवावे या उद्देशाने ही पोस्ट स्पर्धा महाविद्यालयात आयोजित करण्यात आली असल्याचे विद्यार्थ्यांना उत्साहाने सहभाग दिला त्यातील पाच पोस्टरला बक्षीस देण्यात आली यात सतरा विद्यार्थ्यांनी सहभाग दिला. परीक्षण डॉ.बी. स्वाईन यांनी केले.

Scanned with OKEN Scanner

## ९ ऑगस्ट २०२३ मेरी माटी मेरा देश शपथ अभियान

प्रिन्सिपल अरुणराव कलोडे महाविद्यालयातशासनाच्या परिपत्रकाप्रमाणे दिनांक ९ ऑगस्ट २०२३ रोजी प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जंगीतवार यांच्या अध्यक्षतेखाली मेरी माटी मेरा देश या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी डॉ. स्मिता जोशी यांनी विद्यार्थी शिक्षक यांना आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महाविद्यालयात प्रांगणात शपथ दिली यात विद्यार्थी उपस्थित होते






Scanned with OKEN Scanner

अहवाल                                  दि: 25/04/2024

प्रति,
मा. प्राचार्य
प्रिन्सिपल अरुणराव कलोडे महाविद्यालय,
ओंकार नगर, नागपूर

विषय: अँटी रॅगिंग समितीचा अहवाल सादर करण्याबाबत

महोदय,

आपल्या माहितीस अहवाल सादर करतो की शैक्षणिक सत्र 2023-2024 या करिता महाविद्यालयामध्ये अँटी रॅगिंग समिती स्थापन करण्यात आली. आणि सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अँटी रॅगिंग समिती स्थापनेची सूचना सुद्धा देण्यात आली. त्यानुसार सत्र 2023-2024 या शैक्षणिक सत्रात कोणत्याही प्रकारची लेखी तक्रारीची नोंद झालेली नाही.
करिता सदर अहवाल आपल्या माहितीस सादर

Offi. Principal
Principal Arunrao Kalode Mahavidyalaya
Omkar Nagar, Nagpur-27

समिती प्रमुख
डॉ. नितीन अंगणवार

# * सभेचा अहवाल *

दिनांक ०२ एप्रिल २०२५ रोजी प्रिन्सिपल अरुणराव कलोडे महाविद्यालयात सकाळी ठीक १०.०० वाजता माजी विद्यार्थ्यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. प्रस्तुत सभेला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. भौमिक तसेच नॅकचे समन्वयक डॉ. बी. खराईन, सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व माजी विद्यार्थी इत्यादी उपस्थित होते.

या सभेत खालील विषयावर विचार-विनिमय करून ठराव संमत करण्यात आले.

1) माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याच्या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. नंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. डी. एस. भौमिक व प्रा. पंढरी जी. मोरे यांनी मेळाव्यासंबंधी आयोजनाचा हेतू व प्रास्ताविक पर मार्गदर्शन केले.

२) माजी विद्यार्थ्यांचे शब्द सुमनाने स्वागत करण्यात आले. त्यानंतर त्यांना स्वतःचा परिचय करून देण्यास सांगण्यात आले. तसेच माजी विद्यार्थ्यांनी स्वतःचे

मनोगत सुद्धा व्यक्त करावे, असे सुचित करण्यात आले. व त्यानुसार काही माजी विद्यार्थ्यांनी भावपूर्ण मनोगत व्यक्त केले.

3) चालू सत्रामध्ये महाविद्यालयात राबवावयाच्या कार्यक्रमासंबंधी व उपक्रमाविषयी रूपरेषा ठरविण्या-करिता माजी विद्यार्थ्यांची कार्यकारणी गठित करण्यात आली.
ती पुढीलप्रमाणे

1) प्रतीक्षा कोहळे – अध्यक्ष
2) आशिलेश खवसे – उपाध्यक्ष
3) दिव्या डहाड – सचिव
4) अनिकेत लडसे – सहसचिव
5) ध्यानराज पारसे – कार्याध्यक्ष

माजी विद्यार्थ्यांच्या कार्यकारणीचे सर्वानुमते अभिनंदन करण्यात आले. भविष्यातील पुढील कार्यक्रम होण्याकरिता शुभेच्छा देण्यात आल्या.

4) सभेपुढे इतर विषय नसल्यामुळे डॉ. सचिन भोसेकर यांनी आभार

प्रदर्शित केले. व प्रा. पी.जी.मोरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. मा. अध्यक्षांच्या परवानगीने मेळावा संपन्न झाला. असे जाहीर करण्यात आले.

(signature)

प्रा. पी.जी. मोरे

# Principal Arunrao Kalode Mahavidyalaya

## Onkar Nagar, Nagpur

## Session-2023-2024

# Annual Report of the Internal Quality Assurance Cell

During the session2023-2024, the IQAC of the college has taken the following initiatives:-

| Initiative of the IQAC | Executed/ Not Executed |
|---|---|
| Regular meetings of the IQAC | Executed |
| Framing of Academic Calendar | Executed |
| Implementation of Academic Calendar | Executed |
| Curriculum Planning | Executed |
| Innovative/ Creative methods of Teaching-Learning | Executed |
| ICT based Teaching | Executed |
| Co-curricular Activities:- visits/tours, etc. | Executed |
| Community Service | Executed |
| Faculty Development Programme | Executed |
| Parent-Teacher & Alumni Meet | Executed |
| Tests , Terminal Examinations (Even Semesters) & Final Examinations (Odd Semesters) | Executed |
| Collection of Feedback, Feedback Analysis & Action taken on the Analysis of the Feedback | Executed |
| Employability Skill Enhancement Program | Executed |
| NSS Camp | Executed |
| Sports & Cultural Activities | Executed |
| Certificate Courses /Add on courses | Executed |
| Contribution to environment :- Cleanliness Drive & Sapling Plantation Drive | Executed |
| Organization of Poster Competition on various themes:- Scientific, Environmental, Social, etc. | Executed |
| Celebration of National Science Day | Executed |
| Participation of students in Inter-college activities | Executed |
| Research & Publication | Executed |
| Students Counselling/ Mentoring for both personal & professional development | Executed |
| Remedial Classes/ Extra Classes | Executed |
| Guest Lecture | Executed |
| Organization of Seminar/ Workshop/Conference | Executed |
| Incentive Prizes given to Toppers of IV Semesters | Executed |
| Students' Seminar/ Project | Executed |
| Gender Sensitization Program | Executed |

Co-ordinator IQAC
Principal Arunrao Kalode Mahavidyalaya
Nagpur-27

Principal
Principal Arunrao Kalode Mahavidyalaya
Nagpur-27

Scanned with OKEN Scanner

# • अहवाल •

दि: ०३/०४/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य
प्रिंसिपल अरुणराव कलोडे महाविद्यालय,
नागपूर - 27

विषय : सत्र-२०२३-२०२४ पालक-शिक्षक सभेच्या वार्षिक अहवाल सादर करण्याबाबत

महोदय,

आपल्याला माहितीस पालक-शिक्षक सभा सत्र-२०२३-२०२४ च्या वार्षिक अहवाल सादर करतो. की दिनांक ०२ एप्रिल २०२४ रोजी मंगळवारला पालक-शिक्षक सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये पाल्यासंबंधीच्या शैक्षणिक समस्या व अडचणी या विषयी चर्चा करण्यात आली. तसेच पालकाकडून या सभेमध्ये महाविद्यालयातील शैक्षणिक सुधारणा व पाल्यांना येणाऱ्या विविध अडचणी यासाठी काही सूचना करण्यात आल्या. पालकांनी आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक सुधारणेसंबंधी शिक्षकांशी चर्चा

Scanned with OKEN Scanner

केली. या सभेकरिता पालक-शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रस्तुत अहवाल आपल्या माहितीस सादर

(signature)

प्रा. पी. जी. मोरे

* अहवाल *

दि: 06/03/2024

प्रति,

मा. प्राचार्य

प्रिन्सिपल अरुणराव कलोडे महाविद्यालय,

नागपूर

विषय: सत्र 2023-024 चा Job & Placement समितीचा अहवाल सादर करण्याबाबत

महोदय,

आपल्या माहितीस्तव अहवाल सादर करतो की, सत्र 2023-024 या शैक्षणिक सत्रामध्ये JOB & PLACEMENT समितीच्या वतीने दिनांक 05/03/2024 रोजी मंगळवारला महाविद्यालयातील सभागृहात "उद्योजकता व स्वयंरोजगार या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्र-मा प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून डेक्कॉन सोल्यूशनचे संचालक डॉ. प्रशांत डेबरे उपस्थित होते. त्यांनी शॉक प्रुफ इलेक्ट्रिकल डिवाइस स्वत: तयार करून यातून उद्योजकता व स्वयंरोजगार कसा प्राप्त करावा या विषयक माहिती दिली. या कार्यक्रमाला

अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. भौमिक सर उपस्थित होते व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून साईबाबा लोकसेवेचे अध्यक्ष श्री. ओंकार भाऊ उमाळे उपस्थित होते. सदरील कार्यक्रमास प्राध्यापक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी व 60 विद्यार्थी उपस्थित होते.

प्रस्तुत अहवाल आपल्या माहितीस सादर

समिती प्रमुख

प्रा. पी. जी. मोरे

PAGE :
DATE : / /

शैक्षणिक सत्र २०२३-२०२४ मध्ये महाविद्यालयात संपन्न झालेल्या
सांस्कृतिक कार्यक्रमाचा
० वार्षिक अहवाल ०

१) १ ऑगस्ट : बाळ गंगाधर टिळक स्मृतीदिन आणि साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे जयंती :

बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी आणि साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्य महाविद्यालयात १ ऑगस्ट २०२३ रोजी आदरांजलीचा कार्यक्रम संपन्न झाला. सकाळी ठीक १०:०० वाजता सुरु झालेल्या आदरांजली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जांगितवार होते. याप्रसंगी डॉ. मनोहर नाईक यांनी विद्यार्थ्यांना समयोचित मार्गदर्शन केले. डॉ. नितीन जांगितवार यांचे अध्यक्षीय भाषण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. राणी कुमरेवार या विद्यार्थिनीने तर आभार प्रदर्शन कु. अपेक्षा हटे या विद्यार्थिनीने केले.

२) १५ ऑगस्ट : स्वातंत्र्य दिन :

१५ ऑगस्ट हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून महाविद्यालयात अतिशय आनंदाच्या व उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. साईबाबा लोकसेवा संस्थेचे अध्यक्ष मा. ओंकारभाऊ उमाठे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. ध्वजारोहणाचा कार्यक्रम सकाळी ठीक ८:१५ वाजता संपन्न झाला. प्रभारी प्राचार्य डॉ. जांगितवार यांनी प्रास्ताविक केले. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मा. ओंकारभाऊ उमाठे यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पी. जी. मोरे यांनी केले. आभारप्रदर्शनानंतर मिठाई वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

Scanned with OKEN Scanner

२) संस्थापक दिन :-

सावित्राबा जोतिबा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आचार्य जयरामजी कळोडे यांच्या स्मृतीदिनानिमित्य दिनांक २८ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयात सकाळी ठीक १०:१५ वाजता आदरांजली कार्यक्रम संपन्न झाला. प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जंगीतवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रथमत: डॉ. जंगीतवार यांनी प्राचार्य अरुणराव कळोडे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून आदरांजली वाहिली. याप्रसंगी त्यांनी सरांप्रति कृतज्ञता व्यक्त करणारे विचार मांडले. उपस्थित सर्वांनी सरांच्या प्रतिमेला पुष्प आणि आदरांजली अर्पण केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनोहर नाईक यांनी केले. डॉ. स्मिता जोशी यांनी आभार प्रदर्शन केले.

३) ५ सप्टेंबर : शिक्षक दिन :-

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे पुढाकार घेऊन महाविद्यालयात 'शिक्षकदिन' कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जंगीतवार होते. शिक्षक दिनानिमित्य डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करणारे विचार मांडले. शिक्षकदिनाच्या निमित्ताने डॉ. बी. स्वाईन, डॉ. स्मिता जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणानंतर अल्पोपहार देण्यात आला.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. ऋतुजा उरकुडे या विद्यार्थीनीने केले. आभार प्रदर्शन कु. सलोनी टेंटे या विद्यार्थीनीने केले.

४) २ ऑक्टोबर : महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री जयंती :-

महात्मा गांधी जयंतीची सुटी असल्यामुळे महाविद्यालयात दिनांक २ ऑक्टोबर २०२३ रोजी महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री यांच्या संयुक्त जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जंगीतवार होते. सर्वप्रथम डॉ. जंगीतवार यांनी म. गांधी आणि लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून आदरांजली अर्पण केली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जंगीतवार यांनी याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. नंदिनी माथूरकर तर आभार

प्रदर्शन सौरभ राजभर या विद्यार्थिनीने केले.

७) २८ नोव्हेंबर : महात्मा ज्योतिबा फुले स्मृतीदिन :

थोर समाजसुधारक महात्मा फुले स्मृती दिनानिमित्त महाविद्यालयात दिनांक २८ नोव्हेंबर रोजी आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जंगीतवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. प्रारंभी डॉ. जंगीतवार यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून आदरांजली वाहिली. याप्रसंगी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना महात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनोहर नाईक यांनी केले. डॉ. स्मिता जोशी यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

८) ६ डिसेंबर : महापरिनिर्वाण दिन :-

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाविद्यालयात ६ डिसेंबरला सकाळी ठीक १०:०० वाजता आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जंगीतवार कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून आदरांजली वाहण्यात आली. डॉ. जंगीतवार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. मनोहर नाईक यांनी केले.

९) ३ जानेवारी : क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले जयंती :

भारतातील आद्य स्त्री शिक्षिका व स्त्री चळवळीच्या उद्गात्या क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात दिनांक ३ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ प्राध्यापिका डॉ. बी. स्वाइन होत्या. प्रभारी प्राचार्य डॉ. जंगीतवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी

डॉ. [illegible] जोशी आणि डॉ. मनोहर [illegible] यांनी विद्यार्थ्यांना [illegible] शैक्षणिक क्रांतीविषयी माहिती दिली. डॉ. [illegible] यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन

९) २६ जानेवारी : प्रजासत्ताक दिन :

प्रजासत्ताक दिनानिमित्ताने महाविद्यालयात २६ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ठीक ८:०५ वाजता ध्वजारोहणाचा व ध्वजवंदनाचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सद्भावना लोकसेवा संस्थेचे सचिव मा. किशोरभाऊ उमाळे होते. ध्वजारोहणाचा सन्मान यावर्षी ज्येष्ठ प्राध्यापिका डॉ. सुमिता जोशी मॅडम यांना देण्यात आला. ध्वजवंदनेनंतर प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जगीतवार यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी काही विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्ताने आपले विचार व्यक्त केले. कु. आकांक्षा भोयर या विद्यार्थिनीने गीत सादर केले. क्रीडा विभागातर्फे प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना यावेळी बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. किशोरभाऊ उमाळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पी. जी. मोरे यांनी केले. प्रा. माधुरी चौधरी मॅडम आभारप्रदर्शन केले. मिठाई वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.

१०) १९ फेब्रुवारी : छत्रपती शिवाजी महाराज जयंती :-

'बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज' यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जगीतवार यांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. वरिष्ठ लिपिक मा. उमेश सरोदे यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षीय भाषणातून डॉ. जगीतवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रा. पी. जी. मोरे यांच्या

[illegible]

PAGE:
DATE: / /

१६) २७ फेब्रुवारी : मराठी भाषा गौरव दिन : —

वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. मराठी भाषा गौरव दिनाचा कार्यक्रम महाविद्यालयात दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. नितीन जंगीतवार होते. सुरुवातीला मा. अध्यक्षांनी वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. यानंतर विद्यार्थ्यांनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने आपले विचार व्यक्त केले. डॉ. जंगीतवार यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सौंदर्या रंजणकर या विद्यार्थीनीने तर, आभार प्रदर्शन कु. आकांक्षा भोयर या विद्यार्थीनीने केले.

१७) ८ मार्च: जागतिक महिला दिन :—

जागतिक महिला दिनानिमित्ताने महाविद्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या 'महिला सन्मान' सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. भौमिक सर होते. कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक डॉ. उर्वशी गुप्ता यांनी 'आरोग्य आणि स्वच्छता' या विषयावर उपस्थित सर्वांना मार्गदर्शन केले. जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम साईबाबा लोकसेवा संस्थेचे अध्यक्ष मा. ओंकारभाऊ उमाठे व सदस्या डॉ. प्रीती उमाठे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून नंदी फाउंडेशनच्या डॉ. पल्लवी भाट देखील उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रियंका भांटघरे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. सोनाली भांडे मॅडम यांनी केले.

PAGE :
DATE : / /

१२) १४ एप्रील : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती :-

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात दिनांक १५ एप्रील २०२४ रोजी आदरांजली कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. भौमिक सर होते. प्रारंभी डॉ. भौमिक सर डॉ. स्वाईन मॅडम, डॉ. नाईक आणि प्रातिनिधिक विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी डॉ. स्वाईन मॅडम यांनी विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकरांच्या कार्याची महती वर्णन करून सांगितली. डॉ. मनोहर नाईक यांनी आपल्या प्रमुख भाषणातून देशाच्या वर्तमान स्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे महत्त्व समजावून सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. वैशाली चिल्लुरे मॅडम यांनी केले.

(डॉ. मनोहर नाईक)

सांस्कृतिक विभाग प्रमुख.

Scanned with OKEN Scanner